पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १२

**सभावृत्तांत**

दिनांक - **२८/११/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा वार बुधवार दिनांक – **२८/११/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.बारणे माया संतोष
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर – नगरसचिव, पुजारी- कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) BRTS रोड वरील बसस्टॉपच्या ठिकाणी पाणपोई व स्वच्छतागृहाची सोय करणेबाबत.- मा.सुलक्षणा धर , मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

**----------**

दिनांक १४/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.११) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २८/११/२०१८
सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.सुलक्षणा धर, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील BRTS रोडवरील बसस्टॉपच्या ठिकाणी नागरिकांच्या सोईसाठी पाणपोई व सुलभस्वच्छतागृहाची सोय करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७४१/२०१८
दिनांक : २८/११/२०१८

( चंद्रकांत पोपट इंदलकर )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.